ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष २४ पुणें, बुधवार तारीख १६ एप्रिल, १९५८ अंक १६

## विविध माहिती

**सूदानला रशिआची आर्थिक मदत**—रशिआनें कोणत्याहि प्रकारच्या अटी न घालतां आर्थिक मदत देण्याची तयारी दाखविल्यास ती घेण्याची तयारी सूदानच्या सरकारनें दाखविली आहे. मदतीचा आराखडा तयार करण्यासाठी रशिअन तंत्रज्ञांचें व तज्ज्ञांचें एक मंडळ लवकरच सूदानचा दौरा करणार आहे.

**भारतामधील परदेशी भांडवल**—१९५५ अखेर भारतांत सार्वजनिक मालकीच्या विभागांत ६३ लाख रुपये भांडवल गुंतलेलें होतें आणि खाजगी मालकीच्या विभागांत ४८०.०१ कोटी रुपये भांडवल गुंतलेले होतें अशी माहिती लोकसभेंत अर्थमंत्री श्री. मोरारजीभाई देसाई ह्यांनीं दिली. त्यानंतरचे आंकडे अद्याप उपलब्ध नाहींत.

**सौराष्ट्रासाठी वेगळें विद्यापीठ**— सौराष्ट्रामधील एक शिक्षणतज्ज्ञ डॉ. आर. के. याज्ञिक ह्यांनीं सौराष्ट्रासाठी वेगळें विद्यापीठ स्थापन करण्यांत यावें, अशी मागणी केली आहे. त्याशिवाय राजकोट येथें स्त्रियांसाठी एक कॉलेज काढावें असेंहि त्यांचें म्हणणें आहे. सौराष्ट्रांतील स्त्रियांत उच्च शिक्षण घेण्याची उत्सुकता जोरावली आहे.

**डच पार्लमेंटच्या सभासदांची विनंति**—भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला डच सरकारनें मदत करावी अशी विनंति डच पार्लमेंटच्या सभासदांनीं केली आहे. भारतापुढें बिकट आर्थिक प्रश्न असून ते सोडविण्यासाठी मदत देण्यांत न आल्यास, स्वतंत्र जगाच्या कक्षेंतून भारत बाहेर पडण्याचा संभव आहे अशी भीतीहि व्यक्त करण्यांत आली आहे.

**मध्यप्रदेशांत सुताची गिरणी**—मध्यप्रदेशांत नेमाड ह्या जिल्ह्यांत एक सुताची गिरणी उभारण्यांत येणार आहे. गिरणीसाठी ५२ लाख रुपये भांडवल लागेल, असा अंदाज करण्यांत आला आहे. गिरणींत सुताच्या प्रत्यक्ष उत्पादनाला प्रारंभ १९६० पासून होईल.

**इजिप्तमधील कापडाचें प्रदर्शन**—इजिप्तच्या व्यापारमंत्र्यांनीं सुती कापडाच्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचें उद्घाटन केलें. प्रदर्शनांत इजिप्तमधील कापसापासून तयार केलेलें निरनिराळ्या २१ देशांतील कापड पहाण्यासाठी ठेवलें आहे. भारतानें प्रदर्शनांत अधिकृत रीत्या भाग घेतलेला नाहीं. पण कांहीं गिरण्यांनीं आपले नमुने पाठविले आहेत.

**उशिरा पडलेला बळी**—१९४५ मध्यें जपानमधील हिरोशिमा शहरावर टाकण्यांत आलेल्या अणुबॉंबमुळें जखमी झालेली एक जपानी मुलगी नुकतीच मरण पावली. मुलगी आजवर विकलांग होऊन जगली होती. १९५५ मध्यें ती न्यूयॉर्कला जाऊन उपचार करून घेत होती. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. तिला कॅन्सरचा विकार झाला होता.

**कांडला येथें वीजकेंद्र**—कांडला बंदरांत वीजपुरवठा करणारें एक केंद्र उभारण्यांत येत आहे. तें सुमारें तीन महिन्यांत तयार होईल. वीजनिर्मिति कोळशाच्या साह्यानें करण्यांत येणार आहे. केंद्र उभारण्यासाठी ७१ लाख रुपये खर्च येईल व त्यामुळें कच्छमधील मुख्य शहरांना वीजपुरवठा करतां येईल.

**हरिजनांसाठी संस्कृत पाठशाळा**—येत्या जूनमध्यें हैदराबाद शहरांत हरिजनांसाठी संस्कृत शिकविण्याची पाठशाळा उघडण्यांत येणार आहे. अशी पाठशाळा उघडण्याची विनंति खुद्द हरिजन नागरिकांकडूनच करण्यांत आली आहे. पाठशाळेंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना जेवणाचा व राहण्याचा खर्च करावा लागणार नाहीं.

**रशिआंतील अणुसंस्थांना भेट**—रशिआंतील अणुसंशोधनविषयक संस्थांना भेटी देण्याचें आमंत्रण संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या अणुशक्ती-समितीला देण्यांत आलें होतें. त्याप्रमाणें ह्या समितीचे तीन वरिष्ठ अधिकारी लवकरच रशिआंत जाणार आहेत. लेनिनग्राड व मॉस्को येथील अणुविषयक संस्था पाहून एका आठवड्यानें ते परत जातील.

**मासळीचें उत्पादन**—१९५६ सालीं भारतांत मासळीचें एकूण उत्पादन १०,१२,२५० मेट्रिक टन इतकें झालें. दरसाल १० लाख मेट्रिक टनांपेक्षा अधिक उत्पादन करणाऱ्या आशिआंतील तीन देशांत आतां भारताची गणना होते. जपान व चीन हे देशहि एवढें उत्पादन करतात. एकूण उत्पादनापैकी ७,१८,६९७ मेट्रिक टन मासे समुद्रांतील होते.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## सहकारी चळवळीमधील सरकारी हस्तक्षेप कमी होणार

### "गोरवाला कमिटीचा अहवाल मान्य करण्यांत सरकारनें घोडचूक केली" —नेहरू

इंडियन को-ऑपरेटिव्ह काँग्रेसच्या तिसऱ्या अधिवेशनाचें उद्घाटन पंतप्रधान पं. नेहरू ह्यांनीं दिल्ली येथें दि. १२ रोजीं केलें. त्यावेळीं त्यांनीं जें भाषण केलें, तें सहकारी चळवळीशीं संबंध असणारांना जबरदस्त धक्का देणारें झालें. पं. नेहरू म्हणाले, "**ऑल इंडिया रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीनें ( गोरवाला कमिटीनें ) केलेल्या 'सहकारी चळवळींत सरकारचा अधिकाधिक हात असावा' ह्या विषयींच्या शिफारसी सरकारनें मान्य करण्यांत घोडचूक केली, हें मी मान्य करतों. मी स्वतः त्या चुकीचा सर्व दोष पत्करतों. कमिटीचा दृष्टिकोन चुकीचा होता.** कमिटीच्या शिफारसींच्या अंमलबजावणीमुळें कांहीं ठिकाणीं तात्कालिक प्रगति दिसून आली, तरी ती सहकारी स्वरूपाची नाहीं. सहकारी चळवळ सरकारी हस्तक्षेपापासून मुक्त असली पाहिजे."

उत्तर प्रदेश राज्याचे सहकार मंत्रि, श्री. मोहनलाल गौतम, ह्यांनीं, "माझ्या राज्यांतील सहकारी चळवळीवरील सरकारी नियंत्रणें काढून घेण्याची व्यवस्था केली जात आहे," असें जाहीर केलें.

**परिषदेनें असा ठराव केला कीं, सरकारी हस्तक्षेप सोसायट्यांच्या दैनंदिन कारभारापर्यंत पोचूं नये; सरकार ज्यांत भागीदार आहे अशा संस्थांवर सरकारचे तीन पेक्षा ज्यास्त प्रतिनिधी असूं नयेत.**

श्री. के. डी. मालवीय ( खाणी व तेलमंत्रि आणि इं. को. काँग्रेसचे अध्यक्ष ) ह्यांनीं प्रास्तविक भाषणांत सहकारी चळवळीवरील सरकारी अधिकार आणि वरचष्मा ह्यास विरोध व्यक्त केला होता.

## तुमचें स्थान कोणतें ?

[ लेखक : श्री. वा. काळे, किं. २ रु. ]

प्रस्तुत संग्रहांतील लेख मनमोकळे प्रकट चर्चात्मक आहेत. वेगवेगळ्या प्रसंगांच्या अनुरोधानें केलेलें विवेचन मार्मिक तर आहेच, पण दिवसेंदिवस खालावत चाललेल्या आर्थिक परिस्थितींत मध्यमवर्गीयांस तें मार्गदर्शकहि होईल. अर्थात्, सर्व विषयांचा शोध व्यावहारिक दृष्टिकोनांतून केलेला आहे आटोपशीर संसाराचें मर्यादित प्राप्तीच्या चौकटींत प्रमाणबद्ध चित्र कसें रेखाटावें, ह्याचा वस्तुपाठच लेखकानें सदर लेखांत दिला आहे. सुखाचा प्रश्न तात्विक अगर वैयक्तिक मतभेदाचा म्हणून सोडून दिला, तरी व्यावहारिक समाधान हस्तगत करण्यासाठीं केवढा तरी सोपान चढून जावा लागतो व त्याचे टप्पे सुलभपणें कसें ओलांडता येतील, हें श्री. काळे ह्यांनीं उत्कृष्टपणें उघड करून दाखविलें आहे. स्वतःला अडचणींत येऊं न देतां व दुसऱ्याला उपसर्ग न होता व्यवहार साधणें व प्रपंच नेटका करणें, हा चालू काळांत पुरुषार्थच आहे. तो साधला तरी बहादुरी साधली, असें म्हणतां येईल. श्री. काळे ह्यांनीं केलेलें विवेचन त्यासाठीं उपयुक्त आहे. चालू काळाला साजेसे विचार व विवेचन पुस्तकांत आहे. भाषा सोपी व शैली भारदस्त असून विचारी माणसाला ह्याचें वाचन खास उपयुक्त होईल.

—प्रसाद ( एप्रिल, १९५८ )


सुरक्षित गुंतवणूक तथापि भरपूर मोबदला

# दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

मुख्य कचेरी : रविवार पेठ, बेळगांव

**मुंबई व म्हैसूर राज्यांत एकूण २१ शाखा**

आमच्या ठेवीदारांसहि योग्य मोबदला मिळावा म्हणून आम्ही ठेवींवरील व्याजाचे दर खालीलप्रमाणें वाढविले आहेत.

★ द. द. शें. ४ टक्के व्याजाच्या त्रैवार्षिक कॅशसर्टिफिकेटसची नवीन योजना—

★ मुदत ठेवी—

| | | | |
|---|---|---|---|
| ६ महिने | द. द. शें. | ३ | टक्के |
| १ वर्ष | ,, | ३। | ,, |
| २ वर्षें | ,, | ३॥ | ,, |
| ३ वर्षें | ,, | ३॥। | ,, |
| ४ वर्षें | ,, | ४ | ,, |
| ★ सेव्हिंग्ज खातें | द. द. शें. | २ | टक्के |
| होम सेव्हिंग्ज खातें | ,, | २॥ | ,, |

★ आकर्षक मोबदल्याची मासिक समान हप्त्यांची क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट खातीं १, २, ३ व ४ वर्षांचे मुदतीनें स्वीकारलीं जातात.

—बँकेचें स्थैर्य व प्रगति दर्शविणारे आंकडे—

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. सहा लाख |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ,, सवातीन लाख |
| एकूण ठेवी | ,, एक कोटी, चौदा लाखांचेवर |

विशेष माहितीसाठीं आमच्या कोणत्याहि शाखेंत चौकशी करा.

गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी., चेअरमन. — एच्. एस्. कुलकर्णी, बी. ए., जनरल मॅनेजर.

काटकसर करून बँकेंत अधिक पैसे गुंतवा.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

खेळतें भांडवल .... रु. नऊ कोटी पंचवीस लक्ष

**ठेवींवर आकर्षक व्याज**

स्पेशल सेव्हिंग्ज द. द. अडीच टक्के

सेव्हिंग्ज द. द. दोन टक्के

चालू ठेव द. द. अर्धा टक्का

दहा हजार अगर त्यावरील रकमा अल्प मुदतीसाठीं आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

बँकेच्या शाखाविस्तारामुळें महत्त्वाच्या व्यापारी केंद्रांशीं व्यवहार सुलभ झाला.

**पुण्यांत सहा शाखा**

टिळक रोड : ४७९/१५-१, माटे बिल्डिंग

सोमवार पेठ : नं. २९५, खेडकर बिल्डिंग

डेक्कन जिमखाना :

कामाच्या वेळा : सकाळीं ८॥ ते १०॥ व दुपारी ५ ते ६॥

खडकी, १२६८ भवानी पेठ व

नवा पूल नजीक, प्रिमिअर गॅरेज, शिवाजीनगर

कामाच्या वेळा : १०॥ ते २॥

मुख्य कचेरी, पुणें २. — चिं. वि. जोग, मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. १६ एप्रिल, १९५८



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रेडिओ व माहितीखात्याचा अहवाल

मध्यवर्ती सरकारच्या रेडिओ व माहितीखात्याचा वार्षिक अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. अहवालांत दिलेल्या विविध प्रकारच्या माहितींत परभाषांतून देण्यांत येणाऱ्या कार्यक्रमाबद्दलहि माहिती देण्यांत आली आहे. सध्यां भारतामधील रेडिओ-स्टेशनावरून अरबी, ब्रह्मी, पोर्तुगीज, पुस्तु, स्वाहिली आणि तिबेटी इतक्या भाषांतून कार्यक्रम प्रक्षित केले जातात. फ्रेंच भाषेतूनहि कार्यक्रमहि प्रक्षिप्त केले जातात. खुद्द भारतांत रेडिओसाठी घेतल्या जाणाऱ्या परवान्यांची संख्या वाढत चाललेली आहे. रेडिओवरील कार्यक्रम ऐकण्यासाठी द्यावी लागणारी परवाना-फी पूर्वी दरसाल १० रु. होती ती दरसाल १५ रु. करण्यांत आली. तरीसुद्धां रेडिओची संख्या कमी झालेली दिसत नाहीं. उलट, दरसाल अधिकाधिक रेडिओंची विक्री होत आहे. भारतांत गेल्या कांहीं वर्षांत बरींच नवीं रेडिओ केंद्रें उघडण्यांत आलीं. त्यामुळें निरनिराळ्या भाषेतील कार्यक्रम ऐकण्याची सोय झालेली आहे. त्याचाहि थोडाबहुत परिणाम रेडिओच्या संख्येवर झाला असण्याचा संभव आहे. देशांत ग्रामीण विभागांत विजेचा पुरवठा अधिक होऊं लागला आहे. मागासलेल्या भागांत सार्वजनिक रेडिओ पुरविण्यासाठी भारत सरकारनें राज्य सरकारांना द्रव्यसाह्य देऊं केलेलें आहे. परंतु खाजगी मालकीचे रेडिओ ज्या वेगानें वाढत आहेत त्या वेगानें सार्वजनिक रेडिओ वाढत असल्याचें दिसून येत नाहीं. सध्यां बाजारांतील रेडिओच्या किंमती सर्वसामान्य माणसाला परवडणाऱ्या नाहींत. स्वस्त किंमतीचे रेडिओ तयार करण्यांत आले तर रेडिओचा प्रसार आणखी झपाट्यानेंच होईल.

---

## बिस्किट कारखानदार-संघाची सभा

भारतामधील बिस्किटें तयार करणाऱ्या कारखानदारांच्या मध्यवर्ती संघटनेची ८ वी वार्षिक सभा दिल्ली येथें भरली होती. संघटनेचे अध्यक्ष श्री. ए. सी. खन्ना ह्याप्रसंगीं केलेल्या भाषणांत म्हणाले कीं, ह्या धंद्यानें आतां आपला माल निर्यात करण्यास प्रारंभ केला आहे. १९५६ सालीं जितकी निर्यात करण्यांत आली त्याच्या चौपट निर्यात १९५७ सालीं करण्यांत आली. १९५७ च्या ऑगस्ट महिन्याअखेर संपलेल्या आठ महिन्यांत भारतामधून ६९,००० रुपये किंमतीचीं बिस्किटें निर्यात करण्यांत आलीं. परदेशांतील गिऱ्हाइकांना भारतामध्यें तयार झालेला माल आवडतो; पण, तेथल्या व्यापाऱ्यांचें असें म्हणणें आहे कीं बिस्किटांचे पुडे अधिक आकर्षक बनविण्यांत यावेत. ही मागणी पुरी करण्यासाठी पुड्यावरील लेबलें परदेशांतून आयात करण्याची परवानगी मिळाली पाहिजे. सभेंत मंजूर करण्यांत आलेल्या एका ठरावांत अशी विनंति करण्यांत आली आहे कीं, बिस्किटाच्या कारखानदारांना आपले कारखाने आधुनिक यंत्रसामुग्रीनें सुसज्ज करण्याची मुभा देण्यांत यावी आणि हें करण्यासाठी जीं यंत्रें देशांत तयार होत नसतील तीं आयात करण्याचीहि सवलत देण्यांत यावी. दुसऱ्या एका ठरावांत धंद्याला लागणाऱ्या कच्च्या मालाच्या व पॅकिंगच्या साहित्याच्या टंचाईबद्दल चिंता व्यक्त करण्यांत आली असून त्यांच्या आयातीस परवाने देण्याचा आग्रह सरकारला करण्यांत आला आहे. १९६०-६१ सालीं दरसाल १७,००० टन बिस्किटें निर्माण करण्याचें उद्दिष्ट धंद्यानें गेल्या वर्षीच मागें टाकलें आहे.

---

## मिठाच्या उत्पादकांचा सरकारला इषारा

सौराष्ट्र आणि कच्छमधील मीठ-उत्पादक-संघानें धंद्याच्या सद्यःपरिस्थितीबाबत एक पत्रक काढून भारत सरकारला इषारा दिला आहे. संघानें आपल्या पत्रकांत असें म्हटलें आहे कीं सध्यां ह्या धंद्याची परिस्थिति कुचंबणेची झाली आहे. मिठाचें उत्पादन भरमसाठ झालें आहे आणि त्याला येणारी परदेशांची मागणीहि बंद झाली आहे. त्यामुळें पुष्कळ मिठागरें बंद करण्याचा प्रसंग येण्याची शक्यता आहे. ह्यापूर्वी कधींहि आलें नव्हतें अशा प्रकारचें अरिष्ट धंद्यावर कोसळण्याच्या बेतांत आहे. मिठाच्या उत्पादकांना आपल्याजवळील सांठा उत्पादनाच्या किंमतीपेक्षा कमी किंमतीलाहि विकणें जरूर होत चाललें आहे. म्हणून हा धंदा वांचविण्यासाठी थोडासुद्धां वेळ न गमाविता सरकारनें जादा मिठाच्या विल्हेवाटीची तरतूद केली पाहिजे. ज्या ज्या ठिकाणीं मीठ उत्पादनाचीं मोठीं केंद्रें आहेत त्या त्या ठिकाणीं रासायनिक कारखाने काढण्यांत यावे. म्हणजे मिठापासून तयार होऊं शकणाऱ्या उपवस्तूंचें उत्पादन करतां येणें शक्य होईल. सरकारनें अशी कांहीं व्यवस्था केल्यास मीठ-उत्पादक तिचा जरूर तो फायदा घेण्यास तयार आहेत. भावनगर येथें सरकारनें एक मीठ-संशोधन केंद्र स्थापन केलेलें आहे. पण, त्या केंद्राचा सल्ला व मार्गदर्शन मीठ-उत्पादकांना मिळूं शकत नाहीं. मिठाच्या धंद्याला मदत देण्यासाठी सरकारनें एकसारखे वाढत जाणारे वहातुकीचे दर कमी केले पाहिजेत आणि देशाची गरज भागून अधिक उत्पन्न होणाऱ्या मिठाला खात्रीची निर्यात बाजारपेठ मिळवून दिली पाहिजे.

---

**सहकारी कायद्यांत दुरुस्त्या**—ग्रामीण कर्जपुरवठा सहकारी संस्थांची रचना आणि नियंत्रित बाजारपेठा ह्यांच्याबद्दलच्या कायद्यांत महत्त्वाच्या दुरुस्त्या करण्यांत येणार आहेत. मुंबई विधानसभेच्या पुढील अधिवेशनांत हें काम हातीं घेण्यांत येणार आहे. ह्यांसंबंधीं लाड कमिटीनें केलेल्या शिफारसींचा सरकार अभ्यास करीत आहे.

**बंगलोरमधील गलिच्छ वस्त्या**—म्हैसूर सरकारनें बंगलूरमधील गलिच्छ वस्त्या सुधारण्यासाठी जी योजना तयार केली आहे, तिला मध्यवर्ती सरकारनें मान्यता दिली आहे. योजनेसाठी ७,२९,६०० रुपये खर्च येईल. सध्यां भिकार जागीं राहत असलेल्या १९२ कुटुंबांची नव्या बांधल्या जाणाऱ्या गाळ्यांतून सोय करण्यांत येईल.

## सहकारी चळवळीबाबत तज्ज्ञाचा गंभीर इशारा

### सर माल्कम डार्लिंग ह्यांचा अहवाल

### (१)

भारत सरकारचे "कोलंबो योजना सल्लागार" ह्या नात्यानें, सर माल्कम डार्लिंग ह्यांनीं भारत सरकारला "भारतांतील सहकारी चळवळीचीं कांहीं अंगें" ह्याविषयीं जो अहवाल सादर केला आहे, त्याला पुरेशी प्रसिद्धि मिळालेली दिसत नाहीं. सहकारी चळवळीच्या प्रगतीच्या दृष्टीनें तो अहवाल वास्तविक अत्यंत महत्त्वाचा आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील सहकारी क्षेत्रांतील ताज्या घडामोडींचा अभ्यास करून राज्यांतील सहकारी खात्यांची संघटना प्रभावी करण्याच्या दृष्टीनें सूचना करण्याचें काम सर माल्कम डार्लिंग ह्यांचेकडे सोंपविलेलें होतें. सहकारी नोकरवर्गाच्या शिक्षणाचा कार्यक्रम आणि जिल्हा व त्याखालील पातळींतील सहकारी चळवळीची संघटना, हे विषयहि त्यांच्या कक्षेंत होते.

ज्या राज्यांतून सहकारी चळवळ विशेष प्रगत झालेली आहे, अशा राज्यांतीलहि शेतकी पतपेढ्यांच्या वाढीचा आंखलेला वेग फाजील जास्त आहे, असें त्यांनीं मत नमूद केलें आहे. उत्पादन, विक्री व प्रक्रिया ह्यांसाठी बऱ्याच नव्या सोसायट्यांची स्थापना सध्यांच्या सहकारी संघटनेला घातुक ठरेल, असा त्यांचा अभिप्राय आहे. ह्या नव्या उपक्रमांच्या जोडीला तितक्याच ईर्षेनें थ्रिफ्ट व क्रेडिट सोसायट्या बळकट करण्याकडे लक्ष पुरविलें पाहिजे, पण तसें होत नाहीं. नव्या सोसायट्यांना प्राधान्य दिलें जात असतांना, सर्वच (नव्या व जुन्या) सोसायट्यांची देखरेख अननुभवी लोकांचे हातीं आहे. सहकारी चळवळींत माणसा–माणसांच्या संबंधांस विशेष महत्त्व असतें, ह्याचें पुरेसें आकलन झालेलें दिसत नाहीं. वरच्या श्रेणींतील अधिकाऱ्यांनाहि हें वर्णन लागूं आहे. पंचवार्षिक योजनेंतील लक्ष्यें ठरविलेलीं आहेत तीं इतकीं मोठीं आहेत कीं, तीं पुरी करण्याच्या स्पर्धेत शेतकऱ्याचा बळी पडण्याचा संभव आहे! शेतकऱ्यांसाठी योजनेंतील लक्ष्यें ठरविलीं आहेत, कां योजनेंतील लक्ष्यांसाठी शेतकरी उपयोगांत आणला जात आहे? असा सर माल्कम डार्लिंग ह्यांचा सवाल आहे. सहकारी चळवळीच्या क्रेडिट भागांत सरकारनें भागीदार होणें ही घटना कितपत योग्य आहे, हें सांगतां येणें कठीण आहे. प्रत्येक अनुभवी सहकारी कार्यकर्त्याला ही बाब चिंताजनक वाटत असली पाहिजे. सहकारी चळवळीचा पाया बळकट व्हायला हवा असल, तर तेथें स्वावलंबन आणि स्वातंत्र्य ह्यांची विशेष जोपासना केली गेली पाहिजे. मोठ्या आकाराच्या सोसायट्यांतून सहकारी भावना वाढीला लागली नाहीं, म्हणजे सहकारी चळवळीला ती गोष्ट मारकच व्हावयाची. शेतकऱ्यांच्या पतीचा विचार न करतां त्यांना भांडवल पुरविलें जाण्याचा फार मोठा धोका सर माल्कम डार्लिंग ह्यांना दिसत आहे. कर्जपुरवठ्यावर अतिशय भर दिला जात आहे; तितकीच महत्त्वाची बाब म्हणजे बचत व काटकसर. पण तिकडे दुर्लक्ष होत आहे.

सहकारी चळवळीची गेल्या कांहीं वर्षांतील प्रगति असमाधानकारक आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. खेळत्या भांडवलाशीं स्वतःच्या मालकाच भांडवल किंवा ठेवी ह्यांच्या प्रमाणाच्या दृष्टीनें जिल्हा बँका व प्राथमिक सोसायट्या ह्यांनीं विशेष प्रगति केलेली नाहीं. थकबाकीचें प्रमाण वाढत आहे व थकलेल्या व्याजाची रक्कम १९५०–५१ मध्यें २९% होती, ती १९५४–५५ मध्यें ४२% झाली आहे. प्रमुख नऊ राज्यांपैकी पांच राज्यांतील सोसायट्यांतील २५% सोसायट्या तोट्यांत चालू आहेत.

---

### बँकासंबंधींच्या धोरणांत बदल हवा

"देशांतील बँकांना फारच थोडें स्वातंत्र्य ठेवलें असून त्यांच्यावर बंधनेंच फार आहेत. बँकांना आणखीहि कांहीं व्यावहारिक अडचणींना तोंड द्यावें लागत आहे. सरकारनें सुरू केलेल्या बचत योजनेंत पैसे ठेवणाऱ्यांना सरकार कांहीं सवलती देते. या प्रकारच्या ठेवींना कर–आकारणींतून वगळण्यांत आलें आहे. यामुळें राष्ट्रांतील बचतीच्या स्वरूपांतील मोठी रक्कम सरकार–नियंत्रित संस्थांत यावी असा सरकारचा उद्देश आहे. या उलट, खाजगी बँकांतून पैसे ठेवणाऱ्यांना कोणत्याच सवलती नाहींत.

"अशाहि परिस्थितींत, आपल्या देशांतील सर्वसाधारण बँकांनीं केलेली प्रगति निश्चितच उत्साहवर्धक आहे. बँकांनीं देशांतील निरनिराळ्या क्षेत्रांतील प्रगतीला बराच हातभार लावलेला आहे, एवढेंच नाहीं, तर भारत सरकारच्या विविध विकास कार्यांतहि आपला योग्य तो वाटा उचललेला आहे. असें असूनहि बँकांच्या कार्यासंबंधीं सरकार उदासीन आहे व कित्येक वेळां त्यांची उपेक्षा केली जाते, आणि बँकांच्या हितसंवर्धनाचें धोरण सरकार ठेवत नाहीं. यामुळें निव्वळ बँकांचेंच नुकसान होणार नसून कालांतरानें देशाचेंहि नुकसान झालेलें आढळेल.

"म्हणून, बँकिंग व्यवसायाच्या वाढीच्या दृष्टीनें बँकिंगविषयक कायद्यांतील तरतुदींचा फेरविचार करणें आवश्यक झालें आहे. बँकांना अधिक स्वातंत्र्य देण्याचें धोरण स्वीकारल्याशिवाय या महत्त्वाच्या व्यवसायाची प्रगति समाधानकारक होणार नाहीं" (श्री. सी. एच. भाभा ह्यांचें इंडिअन बँक्स असोसिएशनच्या वार्षिक सभेंत अध्यक्षीय भाषण.)

---

### ब्रिटन–अॅन ऑफिशियल हँडबुक

### (१९५८ ची आवृत्ति)

गेलीं सतत दहा वर्षेंपर्यंत ब्रिटिश माहिती खात्यानें एक उपयुक्त उपक्रम चालू ठेवला आहे. ब्रिटन–अॅन ऑफिशिअल हँडबुक या नांवाचा एक ग्रंथ प्रतिवर्षीं तें प्रसिद्ध करतें. यामध्यें अद्यावत् माहिती दिलेली असते.

युनायटेड किंग्डमसंबंधीं बिनचूक माहिती देणार हें प्रकाशन आहे. विश्वसनीय अशा संस्थांच्या सहकार्यानें व काळजीपूर्वक या ग्रंथांची रचना केलेली असते. त्यांत मांडलेले विषय पाहिले असतां त्याची उपयुक्तता सहज ध्यानांत येईल. त्यांतील महत्त्वाचे विषय पुढीलप्रमाणें आहेत. यु. किं. चें सरकार व त्यांचा नोकरवर्ग, राष्ट्रीय उत्पन्न, देशांतील कामगार व मालक, समाज हितवर्धक धोरणाचें स्वरूप, इत्यादि.

विशेष म्हणजे, यांत जे माहिती देणारे आलेख, नकाशे व चित्रें आहेत ते या ग्रंथाची उपयुक्तता व वैशिष्ट्य सहज व्यक्त करतात. हा ग्रंथ विविध क्षेत्रांतील अभ्यासू लोकांना अत्यंत उपयुक्त आहे; कारण त्यांतील माहिती संपूर्ण विश्वसनीय आणि अद्ययावत् आहे.

— मा. द. आ.

# नवीन कंपनी कायद्याची दुरुस्ती

( लेखकः—श्री. नारायण विनायक भोंडे,
बी. ए., एलएल. बी., पुणें )

( १ )

"It was recognized that Private enterprise had played and had still a large part to play in the Industrial and economic progress of the Country and that joint stock companies covered such a wide area of the Industrial and commercial field in the private sector that their continued existence and effective functioning should not be imperilled by the imposition of unduly irksome restrictions and fetters on their activities."

—कंपनी कायदा दुरुस्ती कमिटी अहवाल—पृष्ठ ४.

नवीन कंपनी कायदा १ एप्रिल, १९५६ पासून अंमलांत आला. तो तयार करण्याचे अगोदर कायदेमंडळाचे आंत व बाहेर प्रदीर्घ व तपशीलवार विचारविनिमय झाला. तथापि धंदेवाले, व्यापारी, कंपन्यांचे व्यवस्थापक, भागीदार, हिशेबतपासणीस, आयव्ययनिरिक्षक, व वकील तसेंच न्यायाधीश यांनीं त्यांतील तरतुदीवर बरीच टीका केली; फार काय, तो जारी करतांनाच तज्ज्ञ व व्यावहारिक संचालकांना तो लांबलचक, किचकट वाटून व क्षुल्लक बाबींसाठी सरकारी सत्तेच्या शिरकावास वाव देणारी व प्रसिद्धीकरणासाठी दैनिक वृत्तपत्रास मलिदा चारण्यास भाग पाडणारीं अशीं कलमें पाहून अवघ्या १५ महिन्यांतच कंपनी कारभार पाहणाऱ्या खात्यांस स्वतंत्र समिति नेमणें आवश्यक वाटलें. सांप्रत मध्यवर्ति सरकारनें कंपनी कायद्याचा कारभार व अंमलबजावणी स्वतःकडे घेतली असून दिल्ली येथें सचिवालय, मुंबई, कलकत्ता, मद्रास, कानपूर येथें विभागीय कचेऱ्या, त्यांत तज्ज्ञ हिशेबतपासनीस, सॉलिसिटर्स, रजिस्ट्रार्स, यांची नियुक्ति केली आहे. सर्व वेळ काम पाहणाऱ्या अध्यक्ष-समवेत सल्लागार कमिशन असलेमुळें, कंपनी कायद्यांतील अयोग्य, अव्यवहार्य व सदोष भाग त्यांनीं हुडकून काढला व तो नाहींसा अगर दुरुस्त करणेसाठीं मध्यवर्ति सरकारनें दिनांक १५ मे १९५७ रोजीं सदर कायद्यांत दुरुस्त्या व सुधारणा करणेसाठीं, त्याची अंमलबजावणी करतांना व्यावहारिक अडचणी, सदोष मसुदे व अस्पष्टता दूर करणेसाठीं, नवीन कायद्यामागील उद्देश साधण्याकरितां व सुलभतेसाठीं कायद्याचे उभारणींत फरक सुचविणेसाठीं, मद्रास हायकोर्टाचे सेवानिवृत्त न्यायाधीश श्री. एच. व्ही. विश्वनाथशास्त्री यांचे अध्यक्षतेखालीं समिति नेमली. ह्या समितीचें कार्यक्षेत्र मर्यादित आहे. तसेंच पाहूं गेलें तर विषयवार व्यवस्था व वेगवेगळ्या तरतुदींचें संकलन व पुर्नमांडणी हीहि या नवीन कायद्यांत करणें आवश्यक आहे. उदाहरणार्थ, व्यवस्थापक मंडळाचें वेतन अथवा मोबदला यासंबंधींच्या तरतुदी हल्लीं कलम १९८, १९९, २००, २०१, ३०९, ३१०, ३११, ३१४, ३४८ व ३५४, ३८१ आणि ३८७ ह्यांत विखुरली आहे, ती एकत्रित व थोडक्या कलमांत समाविष्ट करणें तितकें अवघड नाहीं; इतकेंच नव्हे तर तें अगदीं शक्य व इष्ट आहे. नादारीच्या पद्धति व खाजगी कंपन्यांची किचकट व खर्चिक तरतुदींपासून सोडवणूक करणें, हेंहि आवश्यक आहे. परंतु तसें करणें, म्हणजे सबंध रचना व उभारणीची उलथापालथ करणें होय असें समितीला वाटतें व म्हणून शक्य तों जुनी विषयवारी ठेवून, प्रत्यक्ष व्यवहार करण्यांत व कलमांचा अर्थ लावण्यांत ज्या अडचणी आढळल्या त्या दूर करण्यावर समितीनं आपलें लक्ष केंद्रित केलें व विद्यमान कलमांचे रचनेंतील दोष शोधून काढणें, त्यांतील अपुरेपणा नाहींसा करणें, संदिग्धतेचें स्पष्टीकरण करणें, चुका दुरुस्त करणें, विसंगति घालविणें, व निरनिराळ्या घटकांत खटके न उडता, सरळ, सुलभ, व परिणामकारक कारभार चालविण्याचे दृष्टीनें जादा तरतुदी समाविष्ट करणें, हा हेतु व प्राप्तव्य समितीनें आपलेपुढें ठेवलें व त्यांस अनुसरून तिनें फरक सुचविले आहेत.

( २ ) हिंदुस्थानांत असलेल्या ज्या कंपन्यांत मॅनेजिंग एजन्सी होत्या त्यांपैकी कित्येकांनीं आपल्या सत्तेचा व ज्ञानाचा उपयोग योग्य रीतीनें केला नाहीं, अशी लोकप्रतिनिधींची समजूत होती व आहे. तसेंच संचालक मंडळावरहि लोकशाहीस अनुसरून नियंत्रणें असावीं असेंहि त्यांचें ठाम मत आहे. जिल्हा कोर्टें व जिल्ह्यांतील वकील, हेहि कंपनी नादारींत निघण्याचे वेळीं जे प्रश्न व बाबी उत्पन्न होतात ते हाताळण्यास असमर्थ आहेत अशीहि समजूत सरकारनें करून घेतली आहे. व म्हणून मॅनेजिंग एजन्सीवरील अविश्वास, व्यवस्थापक व संचालक मंडळाकडून होणारा संभाव्य दुरुपयोग, हे टाळण्याचे बुद्धीनें १९५६ चे कंपनी कायद्यांत तरतुदी केलेल्या आहेत. पण नालायक व कावेबाज मॅनेजिंग एजन्सीचे व आपमतलबी संचालकांचे चळवळीस व कृत्यांस कायदेशीर बंधनें घालतांना आपण लायक व सचोटीच्या व्यवस्थापक मंडळाचे कामांत, औद्योगिक विकासांत व व्यापारविषयक प्रगतीच्या मार्गांत घोंडे ठेवतों व आडकाठी उत्पन्न करतों, ते अंशतः तरी दूर केले पाहिजेत, अशी कायदे करणारास जाणीव झाली व म्हणून कायदा लिहितांना शाई वाळते न वाळते तोंच दुरुस्ती करण्याची जरूर अर्थमंत्रिमंडळास वाटूं लागली. मुंबई राज्यांत कूळकायदा, भाडेनियंत्रण कायदा, हे होतात न होतात तोंच दुरुस्त्याचीं बिलें येतात, किंवा नवीन इमारत झाल्याबरोबर त्याच्या दुरुस्तीचें खातें आपलें काम सुरू करतें, तसाच कांहींसा प्रकार मध्यवर्ती सरकारचे खात्यांत सुरू झाला आहे. कायद्याची अंमलबजावणी, कंपन्यांचा कारभार, नियंत्रणाचा उपयोग, केंद्रीकरणाचे परिणाम, हे दहापांच वर्षांचा अनुभव घेऊन नंतर कायद्यांत बदल करणें उचित होय. ताबडतोब दुरुस्ती सुचविणें, म्हणजे कायदा मुशींत घालणाऱ्यांची अपरिपक्वता, व अदूरदर्शित्व याचा कबुलीजबाब देणें होय.

( ३ ) १९५६ च्या कंपनी कायद्यांत ६५८ कलमें व १२ परिशिष्टें आहेत. इंग्रजी कायद्यांत नसलेले परंतु हिंदुस्थानांतील परिस्थितीस जरूर अशा कित्येक तरतुदी कायद्यांत समाविष्ट केल्या व एका कलमाचें विभाजन अनेक कलमांत करण्यांत आलेलें आहे, हें जरी बरोबर असलें तरी अधिकाऱ्यांच्या वेगवेगळ्या पद्धती ह्यांतील कित्येक कायदाविषयक तरतुदी यांची पुनरुक्ति कंपनी कायद्यांत केली, हें सदर पुस्तक अगडबंब होण्याचें कारण होय असें म्हणण्यास हरकत नाहीं.

व्यवस्थापक मुनिमांचे असोसिएट, कोर्टाची व्याख्या, मॅनेजिंग डायरेक्टर, मेमोरॅन्डम, बदलीची नोंद, मॅनेजिंग कराराची नोंद, कायद्यानें द्यावा लागणारा वार्षिक अहवाल, हिशेबतपासणी, कंपनी कारभाराची चौकशी, गणसंख्या, संचालकाची सेवानिवृत्ति, अथवा आपखुकच व सक्तीचा राजीनामा, लिक्विडेटरचे अधिकार, अधिकारांवर नियंत्रण, कमिटी ऑफ इन्स्पेक्शन व कमिशन, वगैरे तरतुदींचा समितीनें खल केला असून पुष्कळच दुरुस्त्या व सुधारणा सुचविल्या आहेत. त्यांपैकी कांहींचें परीक्षण करण्याचें योजिलें आहे.

## सर्टिफाईड ऑडिटरांचें ऑडिट सरकारनें स्वतःकडे घेतलें

१ जुलै, १९५८ पासून मुंबई राज्यांतील सहकारी संस्थांच्या ऑडिटची पद्धति बदलण्यांत येणार आहे. सध्यां सहकारी खात्याला मान्य असलेल्या ऑडिटरांची एक यादी तयार केली जाते. त्यांतून कांहीं विशिष्ट सहकारी संस्था आपल्या ऑडिटरची नेमणूक करतात. ह्यापुढें, सर्व सहकारी संस्थांचें ऑडिट सहकारी खात्याचा नोकरवर्गच करील. सरकारमान्य खासगी ऑडिटरांचें ऑडिट समाधानकारक नसतें, असें सरकारला आढळून आलें आहे. सहकारी ऑडिटच्या वैशिष्ट्याकडे हे ऑडिटर लक्ष पुरवीत नाहींत व त्यामुळें त्यांच्या ऑडिटचा सहकारी संस्थांना उपयोग होत नाहीं, असें सरकारचें मत आहे. मोठमोठ्या रकमांचा अपहार झाला, तरी तो उघडकीस आणला गेला नाहीं; कारण हे ऑडिटर योग्य त्या दक्षतेनें ऑडिट करीत नाहींत; अशा दुर्लक्षामुळें सहकारी चळवळीची परिस्थिति चमत्कारिक झाली आहे; असें सरकारचें म्हणणें आहे. स्वतःच्या नियंत्रणाखालील ऑडिट, हा त्यावर सरकारचा उपाय आहे. म्हणून, सर्टिफाईड ऑडिटरांचें ऑडिट बंद करण्यांत येत आहे.

सध्यां २,२३१ सहकारी संस्थांचें ऑडिट सर्टिफाईड ऑडिटरांकडून केलें जात आहे. त्यांचें ऑडिट सहकारी खात्याकडे आलें म्हणजे जादा नोकरवर्ग लागेल तो नेमण्यांत येत आहे. चार स्पेशल ऑडिटर व ३५ ऑडिटर नेमले जातील. प्रत्येक स्पेशल ऑडिटरच्या हाताखाली तीन कारकून व दोन शिपाई दिले जातील. प्रत्येक ऑडिटरला एक कारकून व एक शिपाई मिळेल. त्याला ३,७४,००० जादा खर्च दरसाल येईल. सहकारी संस्था सुमारें ३,६५,००० रु. ऑडिट फी देतील; त्यामुळें सरकारवर विशेष जादा खर्चाचा बोजा पडणार नाहीं. उत्पन्न–खर्चांत फक्त ९,००० रु. ची वार्षिक तूट अपेक्षित आहे. अर्बन बँका, अ आणि ब वर्गांतील ५०,००० रु. पेक्षा जास्त खेळत्या भांडवलाच्या सोसायट्या, ५०,००० रु. पेक्षा जास्त उलाढालीच्या कंझ्यूमर्स सोसायट्या, कांहीं हौसिंग, लोन व शैक्षणिक सोसायट्या, इत्यादींच्या ऑडिटमध्यें आतां फरक पडणार आहे. त्यामुळें सर्टिफाईड ऑडिटरांचें ३¾ लक्ष रुपयांचें काम बुडालें आहे.

---

### नव्या नाण्यांमुळें नुकसान

८२७ बसेस व २७५ ट्राम चालविणाऱ्या बॉंबे इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रॅन्सपोर्ट कंपनीला गेल्या वर्षीं नव्या नाण्यांमुळें १६ लक्ष रुपये नुकसान सोसावें लागलें.

---

### पदवी ही अडचण !

सरकारी नोकरींतील कारकुनांच्या जागा फक्त बिगर-पदवीधरांनाच देण्यांत याव्या, ह्या सूचनेचा भारत सरकार विचार करीत आहे.

---

### बोनस शेअर्सवरील कर

१९५६–५७ या आर्थिक वर्षांत बोनस शेअर्सवर २६·५ लाख रुपये कर आकारण्यांत आला. १९५७–५८ या वर्षांत फेब्रुवारी, १९५८ पर्यंतचा हा आंकडा १६४·४ लाख रुपये होता. १९५८–५९ या वर्षासाठीं यापासून महसुली उत्पन्न सुमारें १५० लाख रुपये अपेक्षित आहे.








श्री. वा. काळे ह्यांचीं
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें
१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,
३ तुमचें स्थान कोणतें ?




यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा

## मध्यवर्ती मजूर खात्याचा १९५७ चा अहवाल

अंमलबजावणींत आढळून आलेल्या कांहीं व्यावहारिक अडचणी दूर करण्यासाठी १९५२ च्या खाणविषयक कायद्यांत दुरुस्ती करणें; एकसारखेपणा व समान दर्जा प्राप्त होण्यासाठी १९४१ च्या माइन्स मॅटर्निटी ॲक्टांत सुधारणा करणें, बांधकाम धंद्यांतील तसेंच मोटर वहातुक धंद्यांतील कामगारांच्या कामाच्या व नोकरीच्या अटी नियंत्रित करण्यासाठी एक स्वतंत्र कायदा करणें आणि १९२३ च्या वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ॲक्टांत ज्या दुरुस्त्या संकल्पिण्यांत आल्या आहेत त्यामुळें उद्योगधंद्यांवर पडणाऱ्या जादा बोजाचा अंदाज घेण्याकरितां ॲक्च्युरिअल कमिटीची स्थापना इत्यादि गोष्टींबाबत भारत सरकारचें मजूर व रोजगार खातें सध्यां विचार करीत आहे.

उद्योगधंद्याची मालकी दुसऱ्याकडे गेल्यामुळें किंवा कारखाना बंद पडण्यामुळें नोकरीला मुकलेल्या कामगारांना नुकसानभरपाई देण्यासाठी इंडस्ट्रियल डिस्प्यूट्स ॲक्ट, १९४७, ह्या कायद्यांत दुरुस्ती करण्यांत आल्याचें मजूर खात्याच्या १९५७ च्या वार्षिक अहवालांत म्हटलें आहे. तसेंच निवाड्यासाठी दाखल करण्यांत आलेले औद्योगिक कलह लौकर निकालांत निघावे म्हणून इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स (सेंट्रल) रूल्स १९५७, मध्यें दुरुस्त्या करण्यांत आल्या.

### औद्योगिक संबंध

काम बंद पडल्यामुळें जानेवारी ते ऑक्टोबर १९५७ पर्यंत कामाचे ५४,५३,२१४ दिवस फुकट गेले. १९५६ मध्यें याच काळांत ६२,००,७१७ कामाचे दिवस फुकट गेले होते. काम बंद पडण्यांत पर्यवसान झालेले १,२३३ नवे औद्योगिक कलह १९५७ मध्यें उद्भवले. १९५६ चा हाच आंकडा १,००६ होता.

मध्यवर्ती सरकारचें टपाल आणि तार खातें, मुलकी विमान-वाहतूक खातें, इत्यादि खात्यांत काम करणाऱ्या भारत सरकारच्या नोकरवर्गानें जुलै १९५७ मध्यें संपावर जाण्याची धमकी दिली होती. मध्यवर्ती सरकारच्या नोकरांच्या वेतनश्रेणीची चौकट तपासण्यासाठी पे कमिशन नेमावें व तावडतोब हंगामी पगारवाढ द्यावी या त्यांच्या प्रमुख मागण्या होत्या. तथापि, संपाची नोटीस मागें घेण्यांत आली व सरकारनें दुसरें पे कमिशन नेमलें.

खाणी, रेल्वे आणि एकाहून अधिक राज्यांत शाखा असलेल्या बँका व विमा कंपन्या या क्षेत्रांतील ४२ तंटे भारत सरकारनें निवाड्यासाठी न्यायमंडळाकडे सोंपविले होते.

सरकारी क्षेत्रांतील कारखान्यांमधील तंटे मिटविण्यासाठी उपाययोजना करण्याकरितां व इंडस्ट्रियल डिस्प्यूट्स ॲक्टप्रमाणें निवाड्यासाठी एकादा तंटा दाखल करणें कितपत उचित आहे त्याबाबत सल्ला देण्यासाठी भारत सरकारच्या निरनिराळ्या खात्यांतील प्रतिनिधी सदस्य असलेली एक स्थायी समिति भारत सरकारनें स्थापन केली.

### रोजगारविषयक परिस्थिति

उद्योगविनिमय केंद्रांतर्फे नोकऱ्या मिळण्याचे बाबतींत १९५६ पेक्षा १९५७ मध्यें थोडीशी वाढ झाली. सर्वसाधारणपणें या वर्षी मालकांनीं उद्योगविनिमय केंद्रांचा जास्त फायदा करून घेतला. डिसेंबर १९५६ अखेरीस रोजगारासाठी नोंद झालेल्यांची संख्या ७,५८,५०३ होती, ती डिसेंबर १९५७ अखेरीस ९,२२,०९९ वर गेली.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत उघडण्यांत येणार असलेल्या १२६ जादा उद्योगविनिमय केंद्रांपैकी ७० नवीं केंद्रें स्थापन करण्यास मंजुरी देण्यांत आली आहे. डिसेंबर, १९५७ अखेरीस भारतांत एकूण १७६ उद्योगविनिमय केंद्रें चालू होतीं.

नोकरीच्या संधीमध्यें वाढ करण्याच्या, नोकऱ्यांच्या संख्येची माहिती मिळविण्याच्या आणि व्यावसायिक व रोजगारविषयक सल्ला देण्याच्या योजनाहि प्रगतिपथावर होत्या.

### कामगार कल्याण

कोळसा खाण कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणकार्यार्थ उभारण्यांत आलेल्या कोळसा खाण मजूर निधीच्या व्यवस्थापकांनीं यंदां आपल्या कामाच्या कक्षेंत बरीच वाढ केली. मजुरांना राहण्यासाठी जागा बांधणें, त्यांच्या मुलांसाठी शिष्यवृत्त्यांची सोय करणें आणि त्यांना आरोग्याच्या विविध सोयी उपलब्ध करून देणें इत्यादि, योजनांचा या कल्याणकारी कार्यक्रमांत अंतर्भाव आहे.

### सामाजिक सुरक्षितता

राज्य कामगार विमा योजनेनुसार विमेदार आजारी असेल, त्याला कामावर असतांना इजा झाली असेल किंवा विमेदार स्त्री बाळंत असेल तर रोकड पैसे आणि वैद्यकीय सोयींच्या स्वरूपांत फायदा मिळतो. ही योजना या वर्षी उत्तरप्रदेश राज्यांतील अलाहाबाद, वाराणशी, रामपूर आणि कल्याणपूर; मध्यप्रदेश राज्यांतील जबलपूर; राजस्थान राज्यांतील बीवार आणि बिहार राज्यांतील पाटणा, कतिहार, मोंघीर आणि समस्तिपूर या ठिकाणीं लागू करण्यांत आली. १९५७ च्या अखेरीपर्यंत ५८ केंद्रांतील सुमारें १२ लाख कामगारांना या योजनेचे लाभ मिळूं लागले होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ७७ लक्ष विमेदार व त्यांचीं कुटुंबें या योजनेच्या कक्षेंत येतील असा अंदाज आहे.

एम्प्लॉइज प्रॉव्हिडंट फंड योजनेचा लाभ नोव्हेंबर, १९५२ मध्यें ती सुरू करण्यांत आल्यापासून ऑक्टोबर १९५७ च्या अखेरीपर्यंत ५,७६६ कारखान्यांतील २९ लक्ष कामगारांना मिळूं लागला. ही योजना लागू असलेल्या व नसलेल्या कारखान्यांची प्रॉव्हिडंट फंडाची ऑक्टोबर १९५७ पर्यंत जमा झालेली वर्गणी एकूण ९५·८५ कोटी रुपये होती. ही योजना लागू असलेल्या कारखान्यांची ३५·६२ कोटी रुपये रक्कम सरकारी रोख्यांत गुंतविण्यांत आली होती.

फंडाचें सदस्यत्व सोडणाऱ्या कामगारांना फंडांतील मालकांचा वांटाहि मिळण्याच्या दृष्टीनें या योजनेंत योग्य ती दुरुस्ती करण्यांत आली होती.

---

## हिंदुस्थान मशीन टूल्स कारखान्याची आगेकूच

### अनेक बाबतींत उच्चांक गांठले

३१ मार्च, १९५८ रोजीं संपलेल्या आर्थिक वर्षांत १ कोटी ६ लक्ष रुपये किंमतीचीं ४०२ मशीन्स तयार केलीं. या वर्षी १३१ मशीन्स तयार करण्याचें ठरविण्यांत आलें होतें. परंतु प्रत्यक्षांत ४०२ मशीन्स तयार करण्यांत आल्यामुळें ठरविलेल्या लक्ष्यापेक्षा ३०० टक्क्यांनीं अधिक उत्पादन झाल्याचें दिसून येईल. गेल्या वर्षीच्या याच कालावधींत ५७ मशीन्स तयार करण्याचें ठरविण्यांत आलें होतें. परंतु प्रत्यक्षांत ५३ लक्ष रु. किंमतीचीं १३५ मशीन्स तयार करून त्याहि वर्षी या कारखान्यानें आघाडी मारली होती. वास्तविक सन १९६०–६१ पर्यंत या कारखान्यांत दरवर्षी ४०० लेथ्सप्रमाणें मशीन्स तयार करण्याचें ठरविण्यांत आलें होतें.

**बंडखोर स्त्रियांचा विजय**—राजस्तानमधील एका खेड्यांतील ५० स्त्रियांनीं पडदापद्धति सोडून दिली आणि गांवांतील अस्पृष्ट स्त्रियांना बरोबर घेऊन त्या मिरवणुकीनें गांवांतील देवळांत गेल्या. आतां हा क्रम त्यांनीं रोज सुरू केला आहे. ह्या स्त्रियांच्या पतींनीं खूप विरोध केला. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. आतां तेहि सहकार्य करीत आहेत.

**इराणच्या राणीला तनखा**—इराणची घटस्फोटित राणी सुरय्या हिला ५०,००० पौंड रक्कम देण्यांत येणार असून शिवाय दरमहा १,५०० पौंड तनखाहि मिळणार आहे. सध्यां ती पश्चिम जर्मनींतील कलोन शहरीं आपल्या बापाच्या घरीं राहत आहे. वरील तरतुदींखेरीज तिला एक किताबहि देण्यांत येणार आहे.

### स्टँप ड्यूटीमधील वाढ

| वर्णन | नग | चालू दर ( ५०% सरचार्ज धरून ) | | | | १,००,००० रु. वर पडणारी स्टँपड्यूटी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जुनीं नाणीं | दशमान नाणीं | नवा दर | वाढ | चालू दर | नवा दर |
| शेअर्स | प्रत्येक २,५०० रु. | २ आ. ३ पै | १४ न. पै. | २० न. पै. | ४३% | ५·५० रु. | ८·०० रु. |
| कपास | प्रत्येक व्यवहार | ६ आ. | ३७ न. पै. | ४० न. पै. | ८% | २·२५ रु. | २·४० रु. |
| चांदी | प्रत्येक २,८०० तोळे | ३ आ. | १९ न. पै. | २० न. पै. | ५% | ४·२० रु. | ४·४० रु. |
| सोनें | प्रत्येक २५० तोळे | १२ आ. | ७५ न. पै. | ७५ न. पै. | ०% | २·६० रु. | २·६० रु. |

शेअर्सवरील स्टँप ड्यूटी आधींच जास्त होती, ती पुनः आणखी अधिक टक्क्यांनीं वाढविण्यांत आली आहे, असें वरील तक्त्यावरून दिसून येईल.


## * दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :-१० बुधवार पेठ, पुणें २ ★ मुंबई शाखा :-८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन २७६३ ) ★ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५२४०८ )

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००

जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३०,४९०

खेळतें भांडवल ... ... रु. ५८,००,०००

उपाध्यक्ष श्री. दा. ग. बापट

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १¾% टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर

श्री. वा. काळे ह्यांच्या कौटुंबिक पुस्तकांचे गुजराती अनुवाद.

' सस्तु साहित्य एटले उंचामां उंचुं साहित्य '

☞ सदाचारने पगले અથવા શિષ્ટાચાર ☜

' पुढे पाऊल ' ह्या दुसऱ्या पुस्तकाचा प्रा. शशिन ओझाकृत अनुवाद, विक्रीस तयार.

पृ. सं. १३७ ] ★ [ किंमत रु. १·२५

☞ સુખી જીવનની પગદંડી ☜

' कण आणि क्षण ' च्या प्रा. ओझाकृत अनुवादाची दुसरी आवृत्ति.

पृ. सं. १६८ ] ★ [ किंमत रु. १·५०

सस्तु साहित्यवर्धक कार्यालय, अहमदाबाद


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास ' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.